आर.सी.सी.३३६/२००३

 शासन वि. बाबुराव

नि.क्र.८३

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ ची शपथेवर जबाब

माझे नांव — कांता बजरंग रांजणकर,

माझे वय – ६४ वर्ष , धंदा : सेवानिवृत्त

राहणार – जालना, ता. जि. जालना.

<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही. व्ही. नगरकर यांच्यामार्फत सूरू</u>

०१. घटनेच्या वेळी मी एन.आर.बी कर्मचारी सहकारी पतसंस्था या संस्थेमध्ये कार्यरत होतो. दि.१७.०५.१९९९ रोजी निवडणुक झाली. त्यानंतर दि.१७.०६.१९९९ रोजी मी संचालक पदी निवडुन आलो. पुर्वीचे अध्यक्ष बाबुराव कावळे व सचिव ठकाजी तमखाने होते. दि.२०.०८.१९९९ रोजी आरोपीने सर्व अभिलेख दिला. मला सदर अभिलेख व लेखा परिक्षक अहवाल यावरुन ₹१,०७,०००/– व ₹३,७५,०००/– ची अफरातफर झाल्याचे दिसुन आले. सदर अफरातफर आरोपी बाबुराव व ठकाजी तमखाने यांनी केल्याचे दिसुन आले. आरोपी बाबुराव आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एन. के. कोहिरे यांच्यामार्फत –</u>

**पुरसीस नि.क्र.७८ अन्वये आरोपी स्वतः साक्षीदाराचा उलटतपास करणार असल्याने साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे स्वतः –**

०२. मी सर्व अभिलेख पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०४.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.